# Current Global Reviewer

UGC Approved International Research Refereed Journal For All Subjects & All Languages

ISSN 2319-8648 | Impact Factor - 2.143 | Indexed (IIJIF) | UGC Approved Sr. No. 64310

SPECIAL ISSUE

21 April, 2018 , Issue: I Vol. I


निलंगा

Indian Council of Social Science Research

# आरक्षण धोरणाचे पुनर्विलोकन आणि सुधारणा

# Review and Reforms of Reservation Policy


Chief Editor

Dr. V.L. Yerande

Principal,

Maharashtra Mahavidyalaya, Nilanga

Editor

Dr. Hansraj D. Bhosale



www.rjournals.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| | मराठा आरक्षणाची मागणी विपर्यास आणि वास्तवता | डॉ. दत्ता मा. कुंचेलवाड | 179-184 |
| | आरक्षण आणि मराठा | डॉ. जे. टी. कांबळे | 185-188 |
| | आरक्षण : आंदोलन मराठा आणि पाटीदार समाजाचे ! | डॉ. सौ. जयदेवी पवार | 189-193 |
| | मराठा आरक्षणाची प्रस्तुतता आणि पर्यायी निती | डॉ. प्रताप पाटील<br>प्रशांत पी. गायकवाड | 194-197 |
| | शेतक-यांच्या मुळ प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज | श्री. दिलीप विश्वनाथराव धुमाळ | 198-200 |
| | मराठा आरक्षण : एक चिंतन | डॉ. पंडीत शेषराव नलावडे | 201-204 |
| | आरक्षण धोरण व मराठा आरक्षण : एक अभ्यास | प्रा.संदीप कोरडे | 205-208 |
| | आरक्षण आणि मानवाधिकार..... | डॉ. विनोद गायकवाड | 209-210 |
| | मराठा समाजास आरक्षणाची आवश्यकता... | डॉ. ए.बी. धालगडे | 211-213 |
| | मराठा व पाटीदार समाजाचे सामाजिक, आर्थिक स्थिती आणि आरक्षणाची आवश्यकता | प्रा. राठोड व्ही. जे. | 214-221 |
| | आरक्षणाच्या धोरणात आर्थिक मागासलेपणाचे महत्व | जगदिश भगवानराव साबळे | 222-227 |
| | मराठा समाजाची सामाजिक आर्थिक स्थिती व आरक्षणाची आवश्यकता | प्रा. सौ. माधुरी गोविंद गिरी | 228-231 |
| | महाराष्ट्रातील मराठा समाज व आरक्षण मागणी | डॉ. एम. डी. कच्छवे<br>डॉ. एस.एस. देवनाळकर | 232-235 |
| | मराठा आरक्षण : एक मीमांसा | डॉ. भगवान एम. वाघमारे,<br>प्रा.ज्योत्सना जी. गायकवाड | 236-239 |


Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol I , 21 April 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

# महाराष्ट्रातील मराठा समाज व आरक्षण मागणी

**डॉ. एम. डी. कच्छवे**
*संशोधन मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख , कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी*
**डॉ. एस.एस. देवनाळकर**
*संशोधन मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभागप्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा*

---

**प्रस्तावना-**

महाराष्ट्रात ब्रिटिश पूर्व काळात मराठा समाज हा १००% शेती करत होता. शेती व शेतीला जोड म्हणून लष्करातील नोकरीही त्याच्या उपजिवीकेची साधने होती. ब्रिटीशांच्या एकछत्री कारभारामुळे नवी उत्पादन व्यवस्था जन्माला आली. मुंबईमध्ये कापड उद्योग सुरु झाले. या कापड उद्योगात शेती करणारा मराठा समाज कामगार म्हणून स्थिरावला. रेल्वे, बंदराचा विकास झाला. कोरडवाहू पट्टा व अति पावसाच्या परिसरातील समाजातील लोक रेल्वे व बंदरे या ठिकाणी कामे करु लागली. महात्मा जोतीराव फुले यांनी महाराष्ट्रात माळी, धनगर व कुणबी (मराठा) या तीन प्रमुख शेतकरी जाती असल्याचे सांगितले. शेतीमध्ये शेतकरी म्हणून, शेतमजूर म्हणून राबणाऱ्या मराठा (कुणबी) जातीची संख्या मोठी आहे. सालगडी म्हणूनही या समाजातील लोक शेतीत आहेत. मराठा समाजातील स्त्री-पुरुष अंगमेहनतीचे व कष्टाचे काम करताना दिसतात. जागतिकीकरणानंतर जमिनीची विभागणी तुकड्या तुकड्यात झाली. मुक्त आर्थिक धोरणामुळे येथील शेती जागतिक बाजारपेठेशी जोडली गेली. शेतीशी स्पर्धा करता करता तो कर्जाच्या ओझ्याखाली दडपला गेला. एखादे पीक घेत असताना त्याने घामासोबत रक्त जाळलेले असते. शेतकरी हा मोठ्या मनाचा असतो. स्वतः हाल अपेष्ठा सहन करुन साऱ्या देशाला अन्न पुरवितो. शेती व्यवसायात टिकून राहण्यासाठी मराठा समाजाचा संघर्ष सुरु असताना राज्यात सेझ, महाकाय प्रकल्प, राष्ट्रीय महामार्ग, औद्योगिक वसाहती इत्यादीसाठी जमिनी काढून घेवून देशी परदेशी भांडवलदारांच्या ताब्यात देण्यात येत आहेत. आज शेतीमधून काही उत्पन्न मिळत नाही. शेतकरी, कर्जबाजारी होत आहे. आज समाजातील बऱ्याच आई वडीलांना असे वाटते की, आपण जे कष्ट सोसले, ते आपल्या लेकराच्या नशिबी येऊ नयेत म्हणून शहरात जाऊन नोकरी कर असे म्हणत आहेत.

**संशोधनाचे उद्देश-**

सदर शोधनिबंध खालील उद्देश डोळ्यासमोर ठेऊन करण्यात आला आहे.

१. मराठा समाजाचा इतिहास पाहणे.

२. मुख्य व्यवसाय अभ्यासणे.

३. महाराष्ट्रातील आरक्षण पाहणे.

४. आरक्षण समित्याचा अभ्यास करणे.

५. निष्कर्ष काढणे.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**गृहीतके :-**

१. मराठा समाजातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.

२. मराठा समाजात भूमिहीन लोक आहेत.

३. समाजातील कांही जणाकडे मोठ्या प्रमाणात जमिनी आहेत.

४. गावपातळी पासून राज्य पातळी पर्यंत राजकारणात समावेश आहे.

**अभ्यासपद्धती-**

सदर शोध निबंधासाठी दुय्यम माहितीचा वापर करण्यात आलेला आहे. दुय्यम माहितील संदर्भग्रंथ, दै. वर्तमानपत्रातील लेख, मासिके इ. चा आधार घेतला आहे. वरील उद्दिष्टे लक्षात ठेवून सामग्री संकलन केले आहे.

**महाराष्ट्रातील आरक्षण-**

मराठा समाज आरक्षणासाठी मोर्चे काढत आहे, निवेदन देत आहे. दिलेले १६ % आरक्षण कोर्टात टिकले नाही. महाराष्ट्रात यापूर्वीच ५२ % आरक्षण दिलेले आहे. १९ % आरक्षण ओबीसी प्रवर्गाला असून त्याखालोखाल अनुसूचित जाती १३ % अनुसूचित जमाती ७ % साठी देण्यात आलेले आहे.

**राज्यातील एकूण आरक्षणाची सध्याची आकडेवारी**

| अ.क्र. | प्रवर्ग | आरक्षण | जाती |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती (SC) | १३ % | ५९ |
| २. | अनुसूचित जमाती (ST) | ०७ % | ४७ |
| ३. | विमूक्त जाती (अ) (VJ) | ०३ % | १४ |
| ४. | भटक्या जमाती (ब) (NT) | २.५ % | ३५ |
| ५. | भटक्या जमाती (क) (NTO) | ३.५ % | ०१ |
| ६. | भटक्या जमाती (ड) (NT३) | ०२ % | ०१ |
| ७. | इतर मागास प्रवर्ग (OBC) | १९ % | ३४६ |
| ८. | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | ०२ % | ०७ |
| | एकूण | ५२ % | |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

खुल्या प्रवर्गासाठी ४८ % आणि मागास प्रवर्गासाठी ५२ % आरक्षण महाराष्ट्रात आहे. खुल्या किंवा मागास संवर्गात सर्वच लोक खरचं प्रगत आहे काय ? आरक्षणाचे निकष योग्यच आहेत काय ? या आरक्षणामुळे कित्येकावर अन्याय होतोय काय ? एक विद्यार्थी दुसऱ्यापेक्षा जास्त गुण मिळवूनही (खुल्या प्रवर्गातील) त्याला नाकारले जाते.

**महाराष्ट्रातील मराठा समाज :-**

ग्रामीण व शहरी भागात मराठा समाजाची स्थिती भयानक आहे. कोणत्याही समाजाची आरक्षण विषयक मागणी योग्य की अयोग्य ती घटनेच्या चौकटीत बसते किंवा नाही याची सखोल तपासणी करुनच आरक्षण देण्यात यावे. मंडळ आयोगामुळे ओबीसींना आरक्षण मिळाले. कोणाला आरक्षण मिळावे याची पद्धत मंडल आयोगाने निश्चित केली आहे. तामिळनाडूत ६९ टक्के आरक्षण आहे. त्यासाठी तेथील सरकारने नेमके काय केल याचा शोध घेवून त्याच पॅटर्ननुसार महाराष्ट्रात समिती स्थापन करुन पुरावे गोळा करुन न्यायालयासमोर मांडल्यानंतर हा आरक्षणाचा प्रश्न सुटेल.

**नारायण राणे समिती-**

मराठा आरक्षणाबाबत नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली. या समितीने लोकांची मते जाणून घेतली. या समितीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात फिरुन प्रत्येक मराठी संघटना, ओबीसी, संघटना, विरोधक, विरोधी संघटना यांची मत जाणून घेतली. १८ लाख लोकांची मतं जाणून घेतली. सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपण जे आहे ते घटनेच्या कलम १५.४ आणि १६.४ प्रमाणे जो आरक्षण देण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे त्याप्रमाणे १६ टक्के आरक्षणाची शिफारस केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाच्या निर्णयाला स्थगिती दिली. राज्यात ५० % पेक्षा जास्त आरक्षण देणे नियमात बसत नाही आणि मराठा समाज सामाजिक दृष्ट्या मागास नसल्याचे निरीक्षण नोंदवत उच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाच्या निर्णयाला स्थगिती दिली.

**न्या. एम. व्ही. गायकवाड समिती-**

१) न्यायमूर्ती एम. व्ही. गायकवाड, २) राजाभाऊ करपे, ३) रोहीदास जाधव, ४) सर्जेराव निमसे मराठा आरक्षण संदर्भात शासनाने दुसरी समिती नेमली. या समितीच्या अध्यक्षपदी न्यायमूर्ती एम. व्ही. गायकवाड यांची नियूक्ती केली आहे. या समितीत एकूण चार सदस्य असून संपूर्ण महाराष्ट्रात फिरून जिल्हानिहाय बैठका होवून समाजातील वेगवेगळ्या संघटनाकडून निवेदन घेत आहेत. तंज्ञाची मते जाणून घेत आहेत.

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या काळात २०१४ मध्ये मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय झ ाला होता. त्या विद्यमान सरकारने पाठिंबा दिला. परंतु कायद्याच्या चौकटीत हे आरक्षण बसू शकते का ? त्यासाठी नेमके काय करावे त्यावर विविध स्तरावर भिन्न प्रतिक्रिया उमटत आहेत. मराठा समाज हा मागासवर्गीय आहे किंवा नाही त्याची मागासवर्ग आयोगाकडून निश्चित होऊ शकते. परंतु घटनात्मक चौकशीचा विचार केल्यास मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णयाची वैधता न्यायालयच ठरवू शकते असे मुख्य न्यायमूर्ती चेल्लुर यांच्या खंडपीठाने सुनावनीत केले आहे. आरक्षणासाठी मराठा समाजाकडून मोर्चे काढले जात आहेत. शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चाचे आयोजन करुन निवेदने दिली जात आहेत. शिक्षण व नोकऱ्यांमध्ये मराठा समाजासाठी १६ टक्के देण्याचा निर्णय झाला. मराठा समाजाची राज्यात ३.५ कोटी लोकसंख्या आहे. मराठा समाज महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात, खेड्यापाड्यात मोठ्या संख्येने आहे. हा समाज एकमेकांशी 'साखळी पद्धतीने जोडला गेल्यामुळे या नेटवर्कचे प्रचंड फायदे या समाजाला राजकारणात आणि इतर क्षेत्रातही मिळत असतात.

**आरक्षण-**

मराठा समाजाच्या महाराष्ट्रात सध्या कार्यरत असलेल्या शिक्षण संस्थापैकी ९५ % शिक्षण संस्था मराठा समाजातील लोकांनी उभ्या केल्या आहेत. साखर कारखाने, उद्योग संस्था, दूध संस्था, सूतगिरण्या उभ्या करण्याचे मोठे कार्य मराठा समाजातील नेत्यांनी केले. मराठ्यांची सत्तेची परंपरा अगदी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अगोदर पासून चालत आलेली आहे. यामुळे मराठा समाजाला गावपातळीपासून देशपातळीपर्यंत सत्ता सांभाळण्याचा शेकडो वर्षाचा अनुभव मिळाला आहे.

मराठा समाजातील फार मोठा वर्ग पिढ्यानुपिढ्या सामाजिक, धार्मिक गुलामीत, दारिद्र्यात, अज्ञानात खितपत पडला आहे. सध्या देशातील तमाम उच्चवर्णीय जातीना मागासपणाचे डोहाळे लागले असून त्यासाठी महामोर्चा, आंदोलने करत आहेत. महाराष्ट्रातील मराठा जात हजारो वर्षाच्या इतिहासात सत्ताधिश म्हणून वावरलेल्या आहेत. मंडळ

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue I Vol I , 21 April 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

आयोगाच्या शिफारशी लागू झाल्यानंतर यांच्या हातातील सत्ता हळूहळू निसटून जाऊ लागली. त्यामुळे आरक्षणाची मागणी पुढे आली.

महाराष्ट्रात मराठा समाज एकूण लोकसंख्येच्या ३५ % आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक विभागात मराठा समाज शेती व शेतीपूरक व्यवसाय करणारा, राजकारण व समाजकारण यात सहभाग नोंदविणारा, कोणत्या भागात जमिनदार तर कोणत्या ठिकाणी भूमिहीन असणारा समाज आज संघर्ष करण्यासाठी रस्त्यावर उतरला आहे. या समाजातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. अजूनही शेती असणाऱ्याकडे बरीच आहे. सुरुवातीपासून या समाजातील कांही व्यक्तीकडे कांहीच जमिन नाही. दुष्काळ, नापीकी, तोट्यातील शेती, व्यापारातील अनुभवाचा अभाव, जमीनीची वाटणी झाल्यामुळे जगण्याचा प्रश्न त्याच्यासमोर मोठा उभा आहे. गावागावात सोसायटी, ग्रामपंचायत यांच्या राजकारणात व गटागटाचे राजकारण करण्यात मराठा समाज पुढे आहे. या निवडणूकीच्या काळात त्याला त्याच्या शेतीतील कामाकडे लक्ष नसते. शेतीसारखे फायद्याचे क्षेत्र कोणतेच नाही. **शेतकऱ्यांनी आपल्या शेतीत काय पिकते यापेक्षा बाजारात काय विकते** ही दृष्टी विकसीत करायला हवी. शेती करण्यांपेक्षा शेतीपूक व्यवसाय करणारे लोक आज आनंदात जीवन जगत आहेत. शेतकरी हा शेतीतून उत्पन्न काढण्यापर्यंतच विचार करतो. आपल्या शेतातील शेतमालावर प्रक्रिया करुन तो तयार माल बाजारपेठेत आणण्याचा विचार करत नाही. शेतीशी ज्यांचा कित्येक पिढ्या संबंध नाही असे लोक शेती मालावर प्रक्रिया उद्योक करुन श्रीमंत होतात. शेतकऱ्यांनी व्यापारी दृष्टीने विचार केला तरी त्याची परिस्थिती बदलु शकते. ज्या जमिनी आहेत त्या जमिनीत कष्ट करुन आपले कुटूंब जगवण्यापूरते धान्य उत्पादन काढू शकतो. परंतु बाहेरचे श्रीमंत व्यापारी, भांडवलदार, उद्योगसमूह येतात आणि थोड्या जास्त किंमती देऊन शेतकऱ्यांकडून जमिनी विकत घेतात आणि आपला व्यवसाय, उद्योग सुरु करतात. पैसे जास्त दिवस जात नाहीत. त्याची पुढची पिढी चपराशाची नोकरी मिळावी म्हणून या जमिनीचा खरा मालक फिरत असतो. त्यासाठी त्याच जमिनीवर व्यवसाय, उद्योग उभे करावेत. स्वतःचा मुळ व्यवसाय सोडून तरुण इतरत्र भरकटत आहे.

**निष्कर्ष -**

मराठा समाज बहुसंख्येने शेती व्यवसायावर अवलंबून आहे. श्रीमंत एकीकडे आणि गरीब दूसरीकडे आहे. गरीबातील मुल शिकत आहेत. चांगले गुण घेत आहेत परंतु गरीबीमुळे पुढे जात नाहीत. १९९० नंतर मराठा समाजातील मुले पुढे येऊन शिखर गाठत आहेत. समाजात लग्नावर वरील खर्च, हुंडा देण, घरी कांही नसताना सणवार, धार्मिक विधी करण यासाठी खर्चाचे नियोजन करणे महत्त्वाचे आहे. ४८ % आरक्षण खुल्या प्रवर्गातून आहे. १६% आरक्षण घेवून समाजाचा सामाजिक, आर्थिक विकास कसा होईल. बलाढ्य, नोकरदार वर्गाचीच पोरं नोकरीला लागतील. जमीनदार लोकांच्या भावना बदलणे महत्त्वाचे आहे. त्याच्या शेती करायला माणूस पाहिजेत म्हणून जमीनदाराकडून गरीबांची पिळवणूक होते. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता या समाजातील गरीब व्यक्तीना शैक्षणिक फायदा मिळण्यासाठी आर्थिक परिस्थिती पाहून आरक्षण द्यावे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. अमोल पाटील - एक माणूस लाख माणूस, बिगुल दि. १२ एप्रिल २०१७.
२. दैनिक वर्तमान पत्रातील लेख, अग्रलेख.
३. इंटरनेट

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta. Sonpeth Dist Parbhani